Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १२०।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्ट मिरवणूक!

(पान २ वर)



» Selected

### भरधाव ट्रकची बोलेरो पिकअपला धडक

**जळगाव | प्रतिनिधी:** पाळधी–जळगाव राष्ट्रीय महामार्गावर भरधाव ट्रकने नवीन बोलेरो पिकअपला समोरून जोरदार धडक दिल्याने चालक जखमी झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले. हा अपघात सोमवार (दि. ३ ऑगस्ट) रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास साई पॅलेस हॉटेलसमोर घडला. या प्रकरणी बुधवारी (दि. ६ ऑगस्ट) जळगाव तालुका पोलीस ठाण्यात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राधेशामपाल किशोरीपाल पाल (वय ४६, रा. रामनगर, मु.पो. भरसवा, जि. बाराबंकी, उत्तर प्रदेश) हे त्यांच्या नवीन बोलेरो पिकअपघेऊन जळगावकडे येत होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या ट्रकचालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत बोलेरोला जोरदार धडक दिली.

## तुकाराम मुंढेंच्या वक्तव्यावर बावनकुळेंचा थेट इशारा

# ‘सावजी रेस्टॉरंट्स बंद पडतील असे बोलू नका’!

### अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणाबाबत केलेल्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र

**जन सम्राट टाईम्स**

**नागपूर : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणाबाबत केलेल्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र झाला आहे. आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सावजी व्यवसायाच्या पाठीशी ठामपणे उभे राहत, अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची विधाने टाळावीत, असा स्पष्ट इशारा दिला आहे.**

**तुकाराम मुंढे नेमके काय म्हणाले?**
अमरावती येथील एका कार्यक्रमात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी, “मी जर सावजी मटण खाल्ले तर महिनाभर आजारी पडेन आणि हॉस्पिटलमध्ये जावे लागेल,” असे वक्तव्य केले होते. या विधानानंतर सावजी रेस्टॉरंट चालक आणि विविध संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. विदर्भाच्या खाद्यसंस्कृतीचा अवमान झाल्याचा आरोपही करण्यात आला.



**बावनकुळेंनी या वक्तव्यावर काय भूमिका घेतली?**
मुंबईत पत्रकारांशी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्यावर थेट आक्षेप घेतला. सावजी हा केवळ एक खाद्यपदार्थ नसून विदर्भाची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. तीन-चार पिढ्यांपासून हजारो कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून असून, हा विदर्भाच्या अर्थकारणाचा आणि संस्कृतीचाही महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**सावजी व्यवसायाबाबत त्यांनी काय सांगितले?**
सावजी ही मसाले आणि पदार्थ बनवण्याची पारंपरिक पद्धत आहे. विदर्भात येणाऱ्या अनेक पर्यटकांना आणि पाहुण्यांना सावजी जेवणाचा आस्वाद घ्यायचा असतो. या मसाल्याची चव आणि पद्धत ही वेगळी असून, त्याची मागणी देशासह परदेशातही वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण सावजी व्यवसायावर नकारात्मक टिप्पणी करणे योग्य नसल्याचे बावनकुळे म्हणाले.

**कारवाईबाबत सरकारची भूमिका काय?**
अन्नात भेसळ आढळल्यास किंवा आरोग्याला धोका निर्माण करणारी बाब समोर आल्यास संबंधित आस्थापनावर कायदेशीर कारवाई करावी, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. मात्र एखाद्या घटनेच्या आधारे संपूर्ण उद्योगालाच दोषी ठरवणे योग्य नाही. चुकी करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, पण संपूर्ण व्यवसायाला लक्ष्य करू नये, असे त्यांनी नमूद केले.

**अधिकाऱ्यांना कोणता इशारा दिला?**
सावजी व्यवसाय हा हजारो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. त्यामुळे “रेस्टॉरंट्स बंद पडतील”, “हा व्यवसाय संपेल” किंवा त्याला फटका बसेल, अशा प्रकारची विधाने अधिकाऱ्यांनी करू नयेत, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला. अशा वक्तव्यांचा परिणाम हजारो व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांवर होऊ शकतो, असेही ते म्हणाले.

**वाद आता कोणत्या टप्प्यावर?**
तुकाराम मुंढे यांच्या वक्तव्यानंतर सावजी व्यवसायाशी संबंधित संघटना, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सार्वजनिकपणे भूमिका घेतल्याने हा वाद आता प्रशासकीय पातळीवरून राजकीय पातळीवरही पोहोचला असून, सावजीच्या मुद्द्यावर राज्यातील चर्चा अधिक तीव्र झाली आहे.

## भुसावळात अनधिकृत नळजोडणीवर नगरपरिषदेची कारवाई!

### श्रद्धा नगरातील माऊली प्लाझा येथील दोन नळजोडण्यांबाबत नोटीस

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ। (प्रतिनिधी):** भुसावळ शहरातील श्रद्धा नगर परिसरातील माऊली प्लाझा येथे कथित अनधिकृत नळजोडणीप्रकरणी भुसावळ नगरपरिषदेकडून संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे. माहिती अधिकार (RTI) अंतर्गत प्राप्त माहितीसह प्रत्यक्ष स्थळ पंचनाम्याच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या पाहणीत संबंधित ठिकाणी दोन नळजोडण्या आढळून आल्या असून, त्या नळजोडण्यांची नगरपरिषदेच्या अभिलेखात कोणतीही नोंद उपलब्ध नसल्याचे नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधितांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून नियमानुसार नळजोडणी नियमित



करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आठ दिवसांची मुदत; अन्यथा कारवाईचा इशारा नगरपरिषदेने नोटीस प्राप्त झाल्यानंतर आठ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित मुदतीत खुलासा न केल्यास संबंधित नळजोडणी खंडित करण्यात येईल तसेच नगरपरिषदेच्या नियमांनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाचा माहिती अधिकाराद्वारे पाठपुरावा करणाऱ्या तक्रारदाराने शहरातील सार्वजनिक सुविधा आणि नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान निकषांवर व्हावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले असून पुढील प्रशासकीय निर्णयाकडे उत्सुकता वाढली आहे.भुसावळ शहरातील श्रद्धा नगर परिसरातील माऊली प्लाझा येथे कथित अनधिकृत नळजोडणीप्रकरणी भुसावळ नगरपरिषदेकडून संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.

## डॉक्टरांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवा विस्कळीत होऊ देऊ



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** राज्यात सुरू असलेल्या डॉक्टरांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सेवांवर परिणाम होऊ नये, यासाठी भाजपा जळगाव महानगरच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. संपामुळे रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये तसेच अत्यावश्यक आरोग्य सेवा अखंडित सुरू ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पर्यायी व्यवस्था उभारावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.
निवेदनात ICU, आपत्कालीन सेवा (Emergency Services) आणि इतर अत्यावश्यक वैद्यकीय सेवा कोणत्याही परिस्थितीत बंद पडू नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गंभीर रुग्णांच्या उपचारांमध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाला करण्यात आले. याशिवाय 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना' आणि 'आयुष्मान भारत' यांसारख्या शासकीय आरोग्य योजनांचा लाभ पात्र व गरजू रुग्णांना नियमितपणे मिळत राहावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. भाजपाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात, "सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची आणि जीविताची जबाबदारी सर्वोच्च असून, कोणत्याही परिस्थितीत रुग्णसेवा खंडित होऊ नये," अशी भूमिका मांडण्यात आली आहे. यावेळी जळगाव शहराचे आमदार सुरेश दामू भोळे (राजूमामा), भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महापौर दीपमाला काळे, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, गटनेते प्रकाश बालाणी, महानगर सरचिटणीस विशाल त्रिपाठी, नगरसेवक निलेश तायडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.राज्यात सुरू असलेल्या डॉक्टरांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सेवांवर परिणाम होऊ नये, यासाठी भाजपा जळगाव महानगरच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

## जळगावात ‘शेतकरी–शास्त्रज्ञ मंच’ची स्थापना!

### शास्त्रज्ञांमध्ये सातत्यपूर्ण संवादावर भर




**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव । (प्रतिनिधी)** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र (KVK), ममुराबाद फार्म, जळगाव आणि जिल्हा परिषद, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'शेतकरी–शास्त्रज्ञ मंच' या अभिनव उपक्रमाची स्थापना करण्यात आली. छत्रपती शाहू महाराज सभागृह, जिल्हा परिषद, जळगाव येथे झालेल्या कार्यक्रमात या मंचाचा शुभारंभ करण्यात आला.
या मंचाच्या माध्यमातून शेतकरी आणि कृषी शास्त्रज्ञ यांच्यात सातत्यपूर्ण संवाद, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार तसेच स्थानिक कृषी समस्यांवर वैज्ञानिक उपाययोजना राबविण्यास चालना मिळणार आहे. आधुनिक शेतीसाठी विविध विषयांवर भर बैठकीत मंचाची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि भविष्यातील आराखडा सादर करण्यात आला. प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, हवामान बदलाशी जुळवून घेणारी शेती, मृदा आरोग्य, जलसंधारण, कृषी यांत्रिकीकरण, मूल्यवर्धन तसेच बागायती, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि मधमाशीपालन यांसारख्या पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यावर विशेष भर देण्यात आला. मान्यवरांचा सहभाग कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी विकास अधिकारी, सहयोगी अधिष्ठाता, कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ, विविध तालुक्यांतील प्रगतशील शेतकरी, महिला व युवा शेतकरी, कृषी उद्योजक तसेच विविध पिकांचे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिता वाघ यांनी या अभिनव उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. शाश्वत कृषी विकासाला बळ जिल्ह्यातील कृषी विकासदर वाढविण्यासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांना या मंचातील प्रगतशील शेतकऱ्यांचे सक्रिय सहकार्य लाभेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार होऊन शाश्वत कृषी विकासाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व प्रगतशील शेतकऱ्यांचा फेटे बांधून सन्मान करण्यात आला.

## तलाठ्यांची मंडळ अधिकारी पदावर पदोन्नती

### जळगाव जिल्ह्यात उर्वरित तीन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव । (प्रतिनिधी)** महसूल विभागातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विभागीय पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार निवड झालेल्या उर्वरित तीन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष उपस्थितीत समुपदेशनाद्वारे पदस्थापना करून पदोन्नतीचे आदेश देण्यात आले. समुपदेशन प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या नव्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून



देण्यात आली. नागरिकांना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेवर सेवा देण्यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत नव्या जबाबदाऱ्यांचे प्रभावीपणे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच महसूल विभागातील कामकाज अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याच्या सूचना दिल्या. महसूल प्रशासनाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने ही पदोन्नती प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे.महसूल विभागातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विभागीय पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार निवड झालेल्या उर्वरित तीन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष उपस्थितीत पदोन्नतीचे आदेश देण्यात आले. समुपदेशन प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या नव्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यात आली. नागरिकांना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वेळेवर सेवा देण्यावर विशेष भर देण्यात आला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या पुढाकाराला मोठे यश

### मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर ८४१ अ‍ॅट्रॉसिटी पीडितांच्या वारसांना शासकीय नोकरी

**जन सम्राट टाईम्स**

**पारोळा | प्रतिनिधी:** अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत खून व अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या पीडितांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर राज्यातील ८४१ अ‍ॅट्रॉसिटी पीडितांच्या पात्र वारसांना शासकीय नोकरी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया मार्गी लागली आहे. आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठका, विविध विभागांशी समन्वय आणि




शासनस्तरावरील पाठपुराव्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात आली. ४८४ प्रकरणांपासून ८४१ लाभार्थ्यांपर्यंतचा प्रवास आयोगाच्या आढाव्यात सुरुवातीला राज्यातील ४८४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समोर आले होते. अनेक जिल्ह्यांमध्ये पात्र लाभार्थ्यांना शासकीय नोकरी देण्यासाठी एकसमान कार्यपद्धती नसल्याने वर्षानुवर्षे प्रकरणे रखडली होती. त्यानंतर आयोगाने सर्व जिल्ह्यांकडून माहिती मागवून एकसमान धोरण तयार करण्यास प्रशासनाला निर्देश दिले. शासनाचा समन्वय, सामाजिक न्यायाला बळ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग, समाजकल्याण आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नातून पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विषयाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना निर्णय प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिल्याने प्रशासकीय अडथळे दूर झाले. यामुळे राज्यातील ८४१ पात्र वारसांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून अनेक कुटुंबांना आर्थिक आधार आणि सामाजिक पुनर्वसनाची संधी मिळाली आहे. भविष्यात विलंब टाळण्यासाठी नवी कार्यपद्धती आयोगाच्या बैठकीत भविष्यात अशा प्रकरणांमध्ये विलंब होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी, समाजकल्याण विभाग आणि नियुक्ती प्राधिकरण यांच्यात समन्वय साधणारी एकसमान कार्यपद्धती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'पीडितांना प्रत्यक्ष न्याय मिळवून देणे हेच ध्येय' आयोगाचे उपाध्यक्ष अ‍ॅड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले की, आयोगाचा उद्देश केवळ तक्रारींची सुनावणी करणे नसून अत्याचारग्रस्त कुटुंबांना प्रत्यक्ष न्याय मिळवून देणे हा आहे. कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार मिळणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. अंमलबजावणीत अडथळे आणणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी दरम्यान, काही जिल्ह्यांमध्ये शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्रस्तावांमध्ये किरकोळ त्रुटी काढून लाभार्थ्यांची प्रकरणे महिनोनमहिने प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि दलित संघटनांनी केला आहे. विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

# तरसोद–फागणे बायपासच्या निकृष्ट कामाविरोधात मनसे–ठाकरे सेना आक्रमक!

## ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट व फौजदारी कारवाईची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** तरसोद ते फागणे बायपास महामार्गावरील कथित निकृष्ट दर्जाच्या बांधकामाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. संबंधित कामाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोषी ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट (Black List) करण्यासह संबंधितांविरुद्ध फौजदारी व प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, तरसोद–फागणे बायपास महामार्ग हा उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून या मार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड व प्रवासी वाहनांची वाहतूक होते. तसेच या मार्गावर लोहमार्ग क्रॉसिंग असल्याने रस्त्याची गुणवत्ता, सुरक्षितता आणि टिकाऊपणा अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तांत्रिक निकष, गुणवत्तेची मानके आणि करारातील अटींचे पालन न झाल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महामार्गाच्या कामाची स्वतंत्र व निष्पक्ष उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करावी. प्रयोगशाळेमार्फत रस्त्याच्या गुणवत्तेची तपासणी करावी. निकृष्ट काम सिद्ध झाल्यास संबंधित ठेकेदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS), भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करावा. संबंधित ठेकेदाराचा शासनाच्या निविदा प्रक्रियेतून कायमस्वरूपी अथवा नियमानुसार ब्लॅकलिस्टमध्ये समावेश करावा. कामाची देखरेख करणाऱ्या अभियंते व अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावरही शिस्तभंग व फौजदारी कारवाई करावी. निवेदनात प्रशासनाला इशाराही देण्यात आला आहे की, या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास संविधानिक मार्गाने आंदोलन छेडले जाईल तसेच सक्षम न्यायालय आणि संबंधित वैधानिक प्राधिकरणांकडे दाद मागण्यात येईल. पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यावेळी मनसेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील, उपतालुकाध्यक्ष शैलेश चौधरी, राहुल चव्हाण, सुनील सोनवणे, प्रशांत बाविस्कर, किरण सपकाळ, चेतन पाटील तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपजिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सोनवणे, तालुकाप्रमुख प्रमोद घुगे, प्रमोद सोनवणे, गणेश पाटील, प्रेमराज राठोड, किरण ठाकूर, लोटन सोनवणे, राजेंद्र पाटील यांच्यासह मनसे व ठाकरे सेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### नियमानुसार ब्लॅकलिस्टमध्ये समावेश करावा

मात्र, संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप करण्यातआलाआहे.तांत्रिकनिकष,गुणवत्तेचीमानकेआणिकरारातीलअटींचे पालन न झाल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महामार्गाच्या कामाची स्वतंत्र व निष्पक्ष उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करावी. प्रयोगशाळेमार्फत रस्त्याच्या गुणवत्तेची तपासणी करावी. निकृष्ट काम सिद्ध झाल्यास संबंधित ठेकेदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS), भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करावा. संबंधित ठेकेदाराचा शासनाच्या निविदा प्रक्रियेतून कायमस्वरूपी अथवा नियमानुसार ब्लॅकलिस्टमध्ये समावेश करावा.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्ट रोजी मिरवणूक!

## सहभागी होण्याचे आवाहन



जन सम्राट टाईम्स

**चोपडा । प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताबाई सोनवणे यांच्या पुढाकाराने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा हा सोहळा अधिक उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले असून तालुकाभरातून आदिवासी बांधव, शिवसैनिक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समिती, चोपडा येथून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे.

विविध बँड पथके, ढोल-ताशांचा गजर आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात शहरातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीदरम्यान महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला जळगाव महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. अमृता सोनवणे व डॉ. गौरव सोनवणे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विविध सांस्कृतिक पथके, पारंपरिक नृत्य आणि बँड पथकांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि परंपरेचा गौरव करणारा हा सोहळा तालुक्याला नवी ऊर्जा देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून चोपडा तालुक्यातील सर्व आदिवासी बांधव आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. चोपडा तालुक्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार लताबाई सोनवणे यांच्या पुढाकाराने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा हा सोहळा अधिक उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले असून तालुकाभरातून आदिवासी बांधव, शिवसैनिक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

---

# धरणगावच्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाला हिरवा कंदिल

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून, स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत प्रस्तावित मलनिस्सारण प्रकल्पाला तांत्रिक मान्यता मिळाली आहे. नगर विकास विभागाने राज्यभरातील वापरलेल्या पाण्याच्या व्यवस्थापन प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्याने धरणगावच्या प्रकल्पालाही गती मिळाली आहे. या यशाचे श्रेय जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला दिले जात आहे. धरणगाव नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत सादर केलेल्या मलनिस्सारण योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाला (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. या प्रकल्पामध्ये ६ एमएलडी क्षमतेचे आधुनिक MMBR तंत्रज्ञानाधारित मलजल प्रक्रिया केंद्र (STP), मलजल वाहिनी जाळे तसेच Interception & Diversion या घटकांचा समावेश असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹१२.४९ कोटी आहे. शासनाने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार मलजल प्रक्रिया केंद्रे, मलजल वाहिनी जाळे, नाले अडवणे व वळवणे, प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर, गुणवत्ता नियंत्रण आणि संचालन व देखभाल यासाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तसेच बेसलाईन सर्वेक्षण, मृदा चाचणी, हायड्रॉलिक डिझाईन, विद्युत व यांत्रिक नियोजन, पुनर्वापर आराखडा आदी बाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर धरणगाव शहरातील उघड्या नाल्यांमधून वाहणारे दूषित पाणी, दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि जलप्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर उद्याने, वृक्षसंवर्धन, रस्ते धुणे, बांधकामे तसेच इतर सार्वजनिक कामांसाठी करता येणार असल्याने नैसर्गिक जलस्रोतांवरील ताणही कमी होणार आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे मत पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील म्हणाले, "स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे. राज्य शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत वापरलेल्या पाण्याच्या व्यवस्थापनासाठी तयार केलेली नवी कार्यपद्धती ही राज्यातील शहरांच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वाची ठरणार आहे. धरणगावसह राज्यातील सर्व नागरी भागांमध्ये आधुनिक मलजल प्रक्रिया सुविधा उभारून सांडपाण्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर वाढविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. धरणगावच्या या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून, तो पूर्ण झाल्यानंतर शहराच्या स्वच्छता व पर्यावरण व्यवस्थापनात गुणात्मक बदल घडून येईल."

---

# तीन महिन्यांपासून सामाजिक सुरक्षायोजनांचीऑनलाइनसेवाठप्प!

## धरणगावात शिवसेनेचे तहसीलदारांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, दिव्यांग, अपंग, परित्यक्ता आदी सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभार्थ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले. ऑनलाइन सेवा तातडीने पूर्ववत सुरू करून प्रलंबित अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शिवसेना (उबाठा) पक्षाचे उपनेते गुलाबराव वाघ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदारांची भेट घेत ही मागणी केली. निवेदनात म्हटले आहे की, संबंधित योजनांची ऑनलाइन प्रणाली तीन महिन्यांपासून बंद असल्याने अर्जांची स्थिती, मानधन जमा झाल्याची माहिती अथवा योजना सुरू आहे की बंद, याबाबत



लाभार्थ्यांना कोणतीही माहिती मिळत नाही. त्यामुळे गरीब, निराधार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि परित्यक्ता महिलांना वारंवार सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत असून आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.धरणगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, दिव्यांग, अपंग, परित्यक्ता आदी सामाजिक सुरक्षा योजनांच्या लाभार्थ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले. ऑनलाइन सेवा तातडीने पूर्ववत सुरू करून प्रलंबित अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी गुलाबराव वाघ यांनी सांगितले की, तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून ऑनलाइन सेवा पूर्ववत सुरू करावी तसेच सर्व प्रलंबित मानधन तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख निलेश चौधरी, तालुकाप्रमुख जयदीप पाटील, शहरप्रमुख भागवत चौधरी, नगरसेवक लक्ष्मण माळी, नगरसेविका हेमांगी अग्निहोत्री, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष जानकीराम पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दलित वस्ती विकासापासून वंचित

जन सम्राट टाईम्स

सोयगाव | प्रतिनिधी : सोयगाव तालुक्यातील माळेगाव पिंप्री येथील दलित वस्तीमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील दुर्लक्ष, सिमेंट रस्ता व गटार नसणे तसेच विविध विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आवश्यक सुविधा नसल्याने परिसरात पाणी साचते व अस्वच्छता निर्माण होते. त्यामुळे नागरिकांना पुतळ्याला अभिवादन करण्यासाठीही अडचणींचा सामना करावा लागत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. दलित वस्तीमध्ये अद्याप सिमेंट रस्ते व गटारांची सुविधा उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात चिखल व साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. या भागातील विकासकामांकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्था


---

# सिंधू महाकुंभातील एकात्मतेच्या संदेशाचा महाराष्ट्राकडून सन्मान

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते इंद्रेश कुमार आणि पाल्गा रिनपोचे यांचा सत्कार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। प्रतिनिधी:** 'सिंधू महाकुंभ' महोत्सवाच्या माध्यमातून देशभरात देण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मतेच्या महत्त्वपूर्ण संदेशाचा महाराष्ट्राच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला आहे. या अनुषंगाने, राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ज्येष्ठ नेते इंद्रेश कुमार आणि बौद्ध धर्मगुरू पाल्गा रिनपोचे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. देशाची अखंडता, शांतता




आणि विविध समुदायांमध्ये परस्पर सामंजस्य निर्माण करण्यासाठी या दोन्ही मान्यवरांनी सिंधू महाकुंभाच्या मंचावरून दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची आणि प्रयत्नांची दखल घेऊन हा सन्मान सोहळा पार पडला. या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने, सिंधू महाकुंभाने पेरलेल्या राष्ट्रीयत्वाच्या आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांना राज्याकडून एक प्रकारे अधिकृत मानवंदना देण्यात आली आहे. देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या या महोत्सवाचे आणि त्यासाठी पुढाकार घेणाऱ्या प्रमुखांचे कौतुक करून, राष्ट्रीय एकात्मतेप्रती असलेली कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आली आहे.

---

# CCMP कोर्सवरून महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्रात संघर्ष; डॉक्टरांचा बेमुदत संप

## 'मिक्सोपॅथी'ला विरोध; ओपीडी सेवा विस्कळीत, रुग्णसेवेवर परिणाम

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्य सरकारने 'सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी' (CCMP) पूर्ण केलेल्या बीएचएमएस (होमिओपॅथी) डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC) मध्ये नोंदणी देऊन मर्यादित स्वरूपात ॲलोपॅथी औषधे लिहून देण्याची परवानगी देण्याच्या निर्णयावरून महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रात मोठा वाद निर्माण झाला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ 'मार्ड' (MARD) आणि 'इंडियन मेडिकल असोसिएशन' (IMA) यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील डॉक्टरांनी बेमुदत संप सुरू केला आहे. या संपाचा परिणाम राज्यातील अनेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, महापालिका रुग्णालये आणि खासगी रुग्णालयांमधील बाह्यरुग्ण विभागावर (OPD) झाला असून सर्वसामान्य रुग्णांना उपचारासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. वादाचा केंद्रबिंदू काय? शासनाचा दावा आहे की, ग्रामीण व दुर्गम भागातील डॉक्टरांची कमतरता लक्षात घेऊन CCMP अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना आधुनिक औषधशास्त्राचे प्रशिक्षण




दिल्यानंतर मर्यादित स्वरूपात ॲलोपॅथिक औषधोपचाराची परवानगी देण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल. मात्र, IMA आणि MARD यांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवत याला 'मिक्सोपॅथी' असे संबोधले आहे. अल्पकालीन प्रशिक्षणाच्या आधारे ॲलोपॅथी उपचाराची परवानगी देणे हे रुग्णांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणारे असल्याचा डॉक्टरांचा आरोप आहे. शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा किंवा स्थगित करावा, अशी त्यांची मागणी आहे. रुग्णसेवेवर परिणाम संपामुळे राज्यातील अनेक ठिकाणी नियमित ओपीडी सेवा विस्कळीत झाली असून उपचारासाठी आलेल्या रुग्णांना परत जावे लागत आहे. अत्यावश्यक सेवा, आयसीयू आणि आपत्कालीन उपचार सुरू ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरी संप दीर्घकाळ सुरू राहिल्यास आरोग्य व्यवस्थेवर अधिक ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. डॉक्टरांची भूमिका डॉक्टर संघटनांच्या म्हणण्यानुसार, केवळ काही महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ॲलोपॅथी उपचाराची परवानगी देणे हे वैद्यकीय शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांविरुद्ध आहे. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी डॉक्टरांची भरती, पायाभूत सुविधा आणि तज्ज्ञांची उपलब्धता वाढविण्यावर शासनाने भर द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनासमोरील आव्हान राज्यभर सुरू असलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभाग पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न करत आहेत. शासन आणि डॉक्टर संघटनांमध्ये तोडगा निघेपर्यंत परिस्थितीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

---

# पाचोऱ्यात अवैध सट्टा-मटका व्यवसायावर कारवाईची मागणी

## एकलव्य संघटना आक्रमक

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** पाचोरा शहर व तालुक्यात अवैधरित्या सुरू असलेल्या सट्टा-मटका व्यवसायामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप करत या व्यवसायावर तातडीने कारवाई करण्याची मागणी एकलव्य संघटनेने केली आहे. एकलव्य संघटनेचे अध्यक्ष सुधाकर वाघ तसेच एकनाथ अहिरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पाचोरा तालुक्यात सुरू असलेले सट्टा-मटका आणि इतर अवैध धंदे त्वरित बंद करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अवैध व्यवसायांमुळे युवक व्यसनाधीन होत असून सामाजिक वातावरणही बिघडत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी अशा धंद्यांवर कठोर कारवाई करून ते कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी त्यांनी केली. याप्रकरणी संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन अवैध सट्टा-मटका व्यवसाय चालविणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा एकलव्य संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. एकलव्य संघटनेचे अध्यक्ष सुधाकर वाघ तसेच एकनाथ अहिरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पाचोरा तालुक्यात सुरू असलेले सट्टा-मटका आणि इतर अवैध धंदे त्वरित बंद करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# विधानसभा अध्यक्षांच्या 'चुकीवर' सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तीवाद

## विधिमंडळ पक्षापेक्षा राजकीय पक्षाचेच वर्चस्व - सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हाच्या वादावर उद्धव ठाकरे विरुद्ध एकनाथ शिंदे गटाच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात बुधवारी, ५ ऑगस्ट रोजी महत्त्वाची सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधीज्ञ यांनी तब्बल तीन तास जोरदार युक्तीवाद करत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या चुकीकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

विधानसभा अध्यक्षांच्या दिरंगाईमुळे एका 'बेकायदेशीर' सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केल्याचा मुद्दा सिब्बल यांनी मांडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले की, "विधिमंडळ पक्षावर राजकीय पक्षाचे नियंत्रण कायम असते आणि राजकीय पक्षाचा कोणताही वैध निर्णय विधिमंडळ पक्षाच्या बहुमताच्या इच्छेपेक्षा वरचढ मानला गेला पाहिजे." या प्रकरणाची पुढील सुनावणी आज, गुरुवारी ६ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजेनंतर होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सुनावणीदरम्यान टिप्पणी केली की, राजकीय पक्षात 'बहुमत' कशाला मानावे, हे ठरवण्यासाठी स्पष्ट निकष असायला हवेत; अशा निकषांमुळे पक्षात पडणारी फूट आणि पक्षचिन्हावरून होणारे वारंवारचे वाद टाळता येऊ शकतात.

ॲड. कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत युक्तिवाद केला की, निवडणूक आयोगाला पक्षघटनेची वैधता ठरवण्याचा कोणताही अधिकार नाही. २०१३ च्या शिवसेना पक्षघटनेची प्रत (कलम ११-अ) १३ मार्च २०१३ रोजीच निवडणूक आयोगाला सादर करण्यात आली



होती, ज्याची पोचपावती आजही आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. २०१८ मधील पक्षांतर्गत निवडणुकांनंतर एकनाथ शिंदे यांची 'राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य' म्हणून नियुक्ती झाली होती आणि ही नियुक्ती 'पक्षप्रमुख' या नात्याने उद्धव ठाकरे यांनीच केली होती. १९९९ च्या घटनेत 'पक्षप्रमुख' हे पदच अस्तित्वात नव्हते, तरीही शिंदे यांनी नव्या घटनेनुसार पदे स्वीकारली आणि २०२२ पर्यंत त्यांनी या घटनेला कधीही आव्हान दिले नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुका अत्यंत यशस्वीपणे लढवल्याचा दाखला सिब्बल यांनी दिला. २०१४ ते २०२२ या काळात एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षात आणि सरकारमध्ये मंत्री म्हणून कार्यरत होते.

या संपूर्ण काळात निवडणूक आयोग, विधानसभा अध्यक्ष किंवा लोकसभा अध्यक्ष यांसारख्या कोणत्याही घटनात्मक प्राधिकरणाने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर किंवा पक्षाच्या घटनेवर कधीही शंका उपस्थित केली नाही, असा भक्कम युक्तिवाद सिब्बल यांनी मांडला.

विधिमंडळ गटनेतेपदावरून एकनाथ शिंदे यांना हटवण्याच्या निर्णयाबाबत न्यायमूर्तींनी विचारलेल्या प्रश्नावर सिब्बल यांनी स्पष्ट केले की, गटनेत्याला हटवण्याचा अधिकार आमदारांना नसून तो 'पक्षप्रमुखांना' आणि राजकीय पक्षाला आहे, हे घटनापीठाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. शिंदे गटाचे आमदार आधी सुरत आणि नंतर गुवाहाटीला गेले, त्यांनी कोणालाही पूर्वकल्पना न देता जे कृत्य केले, ते 'स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडण्यासारखेच' आहे. केवळ बहुमतात असल्यामुळे विधिमंडळ पक्ष मूळ राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना हटवू शकत नाही, असे सिब्बल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सुनावणीच्या अखेरीस सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कामकाजावर आणि देशाच्या लोकशाही मूल्यांवर गंभीर चिंता व्यक्त केली. केवळ आमदार फुटले म्हणून सरकार पाडणे आणि अपात्रतेच्या कारवाईवर पुढील निवडणुका येईपर्यंत निर्णय न घेणे हे लोकशाहीच्या मूलभूत रचनेच्या विरोधात आहे.

एका बेकायदेशीर सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला असून याचा देशाच्या राजकीय व्यवस्थेवर अत्यंत गंभीर परिणाम होईल, असा घणाघात कपिल सिब्बल यांनी केला. शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हाच्या वादावर उद्धव ठाकरे विरुद्ध एकनाथ शिंदे गटाच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात बुधवारी, ५ ऑगस्ट रोजी महत्त्वाची सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधीज्ञ यांनी तब्बल तीन तास जोरदार युक्तीवाद करत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या चुकीकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण: विधिमंडळ पक्षाच्या बहुमतापेक्षा मूळ राजकीय पक्षाचे निर्णय आणि घटनात्मक युक्तिवाद: निवडणूक आयोगाला पक्षाची घटना अवैध ठरवण्याचा अधिकार नाही; २०१३ व २०१८ ची घटना आयोगाकडे अधिकृतपणे जमा होती. नेतृत्वाला आव्हान नाही: एकनाथ शिंदे यांनी २०१४ ते २०२२ पर्यंत उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व आणि पक्षप्रमुख पद मान्य केले होते.


आमदारांचे कृत्य: शिंदे गटाच्या आमदारांनी रातोरात सुरत आणि गुवाहाटीला जाणे म्हणजे स्वेच्छेने मूळ पक्षाचे सदस्यत्व सोडण्यासारखेच आहे. अध्यक्षांची दिरंगाई: विधानसभा अध्यक्षांच्या दिरंगाईमुळे एका 'बेकायदेशीर' सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केल्याचा सिब्बल यांचा युक्तिवाद.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## वक्फ नोंदणी प्रकरणांच्या जलद निकालासाठी खंडपीठाची स्थापना

### इंद्रेश कुमार आणि पाल्मा रिनपोचे यांचा सत्कार




जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** वक्फ बोर्डाच्या मालमत्ता नोंदणीवरून निर्माण होणाऱ्या वाढत्या वादांवर आणि प्रलंबित खटल्यांवर जलद तोडगा काढण्यासाठी एका विशेष खंडपीठाची स्थापना करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिले. राज्यभरात वक्फ मालमत्तांच्या नोंदणीबाबत अनेक कायदेशीर आणि मालकी हक्कांचे दावे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा निपटारा वेळेत न झाल्यामुळे सर्वसामान्यांसह अनेक संस्थांच्या मालमत्तांचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे बनले होते. यावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी आता केवळ वादग्रस्त वक्फ नोंदणी प्रकरणांच्या सुनावणीसाठी ही विशेष न्याय व्यवस्था काम करेल, ज्यामुळे न्यायप्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि प्रलंबित प्रकरणांचा वेगवान निपटारा होईल. याशिवाय, बेकायदेशीर नोंदी आढळल्यास, त्या कायद्यानुसार तातडीने कमी करून पुढील कार्यवाही करण्याचेही निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत. या विशेष खंडपीठाच्या माध्यमातून प्रामुख्याने ज्या जमिनींच्या किंवा मालमत्तांच्या वक्फ नोंदणीला कायदेशीर आव्हान देण्यात आले आहे, अशा दाव्यांवर प्राधान्याने सुनावणी घेतली जाणार आहे. अनेकदा खाजगी मालकीच्या किंवा इतर संस्थांच्या जमिनींवर वक्फ बोर्डाकडून दावा सांगितला जातो,तर काही वेळा मूळ वक्फ मालमत्तांवर बेकायदेशीर अतिक्रमण होते. या दोन्ही परिस्थितींत निर्माण होणारा कायदेशीर गुंता सोडवणे आणि कागदपत्रांची सखोल पडताळणी करून वेळेत निकाल देणे, ही या विशेष खंडपीठाची मुख्य जबाबदारी असेल. ही संपूर्ण प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने राबविण्यावर प्रशासनाचा विशेष भर असणार आहे. या महत्त्वपूर्ण पाऊलामुळे जमिनींच्या मालकी हक्कावरून दीर्घकाळ कायदेशीर लढाई लढणाऱ्या अनेक नागरिकांना आणि संस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. न्यायालयांवरील प्रलंबित खटल्यांचे ताण कमी करण्यासोबतच, जमिनीच्या महसुली नोंदी आणि वक्फ बोर्डाचे अधिकृत रेकॉर्ड यामध्ये सुस्पष्टता आणणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या जलद सुनावणी प्रक्रियेमुळे भविष्यात होणाऱ्या बेकायदेशीर नोंदणी किंवा खोट्या दाव्यांना प्रभावीपणे आळा बसेल आणि प्रदीर्घ काळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेतील नागरिकांचा वेळ व पैशांची मोठी बचत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

## बेकायदेशीर साग वाहतूक करणारी नॅनो कारसह १,००८ साग अनघड बेलन जप्त

### केळीच्या बागेत वाहन टाकून पसार ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स



**चोपडा । प्रतिनिधी:** यावल वन विभागाच्या गस्ती पथकाने गुप्त माहितीच्या आधारे धडक कारवाई करत बेकायदेशीर वनउत्पादनाची वाहतूक करणारी नॅनो कार जप्त केली. या कारमधून १,००८ नग सागाचे अनघड बेलन हस्तगत करण्यात आले असून, वाहनासह एकूण सुमारे ९० हजार १०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईनंतर वाहनचालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. वन विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) पहाटे २ वाजल्यापासून वरगव्हाण–लोणी (पंचक) रस्त्यावर संपूर्ण गस्ती पथकाने सापळा रचला होता. सकाळी सुमारे ६.५० वाजण्याच्या सुमारास MH-43-AJ-3132 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची नॅनो कार संशयास्पदरीत्या येताना दिसली. वन कर्मचाऱ्यांची चाहूल लागताच चालकाने वाहन भरधाव वेगाने पळवून नेण्याचा प्रयत्न केला. गस्ती पथकाने तत्काळ पाठलाग सुरू केला. दरम्यान, चालकाने साई मंदिराजवळील केळीच्या बागेत वाहन सोडून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पलायन केले. वाहन सुरू होत नसल्याने वनक्षेत्रपाल अडावद यांच्या शासकीय वाहनाच्या मदतीने ते टोचन करून मुख्य विक्री केंद्र, चोपडा येथे आणण्यात आले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १,००८ नग सागाचे अनघड बेलन आढळून आले.ल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईनंतर वाहनचालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. वन विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट) पहाटे २ वाजल्यापासून वरगव्हाण–लोणी (पंचक) रस्त्यावर संपूर्ण गस्ती पथकाने सापळा रचला होता. पंचनामा करून वाहन व वनउत्पादनासह एकूण ९०,१०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तो मुख्य विक्री केंद्र, चोपडा येथे जमा करण्यात आला आहे. या प्रकरणी आवश्यक पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक सौरिष सहाय, विभागीय वनाधिकारी (दक्षता) राजेंद्र सदगीर, सहायक वनसंरक्षक एम. बी. पाटील, सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी महेश पाटील, वनपाल के. एल. धनगर, वनपाल संजय पाटील, वनरक्षक सतीश वाघमारे, वनरक्षक आय. बी. चव्हाण आणि पोलीस कॉन्स्टेबल एस. आर. तडवी यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

---

## महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी शेखर मुंदडा यांची पुनर्नियुक्ती

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पुन्हा विश्वास

जन सम्राट टाईम्स

**पारोळा । (प्रतिनिधी):** महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा मागील कार्यकाळ ६ जुलै २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाने शेखर मुंदडा यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करत त्यांची महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या नियुक्तीस मंजुरी दिली. पुनर्नियुक्तीनंतर शेखर मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन विश्वास व्यक्त केल्याबद्दल आभार मानले. आगामी कार्यकाळात राज्यातील गोसंवर्धनाच्या कार्याला अधिक गती देण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी अधिकृत नियुक्ती अधिसूचनेची प्रत देऊन त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी महाराष्ट्रातील गोसंवर्धन, गोशाळांचे सक्षमीकरण आणि गो-आधारित ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा संकल्प मुंदडा यांनी



व्यक्त केला. 'गो-१० व्हिजन'द्वारे आयोगाला राष्ट्रीय स्तरावर आदर्श बनविण्याचा संकल्प शेखर मुंदडा यांनी सांगितले की, पुढील तीन वर्षांत *"गो-१० व्हिजन"*च्या माध्यमातून महाराष्ट्र गोसेवा आयोगाला देशातील सर्वोत्कृष्ट आणि आदर्श आयोग म्हणून विकसित करण्यासाठी संपूर्ण क्षमतेने कार्य केले जाईल. देशी गोवंशाचे संरक्षण, संवर्धन, संगोपन, गोशाळांचे सक्षमीकरण आणि गो-आधारित ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीसाठी हा कार्यकाळ पूर्णपणे समर्पित असेल, असे त्यांनी स्पष्ट केले. पुनर्नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे आभार व्यक्त करत मुंदडा म्हणाले, "हा सन्मान माझ्यासाठी केवळ पदाचा नसून महाराष्ट्रातील गोसेवा चळवळीला अधिक उंचीवर नेण्याची एक पवित्र जबाबदारी आहे." महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा मागील कार्यकाळ ६ जुलै २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाने शेखर मुंदडा यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करत त्यांची महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या नियुक्तीस मंजुरी दिली. पुनर्नियुक्तीनंतर शेखर मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन विश्वास व्यक्त केल्याबद्दल आभार मानले. आगामी कार्यकाळात राज्यातील गोसंवर्धनाच्या कार्याला अधिक गती देण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

---

## रामदास आठवले यांच्या हस्ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ख्रिश्चन आघाडीच्या दोन शाखांचे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ख्रिश्चन आघाडीच्या पुणे शहरातील दोन नव्या शाखांचे उद्घाटन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे कॅम्प येथील डायमंड हॉटेल आणि





विर्वाणी प्लाझा येथे आयोजित कार्यक्रमात या शाखांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पक्ष संघटन बळकट करण्याबरोबरच समाजातील सर्व घटकांना एकत्रित करून जनसंपर्क वाढविण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश संघटक सचिव तथा पुणे शहराचे उपमहापौर परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, पुणे शहर उपाध्यक्ष येसू दोरास्वामी यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला पुणे शहर व जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पाळधी–तरसोददरम्यान महामार्ग खचल्याने वाहतूक ठप्प

### टोल वसुलीवर वाहनचालकांचा संताप



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव–धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाळधी बायपास ते तरसोद फाटा दरम्यान काही दिवसांपूर्वी रस्त्याचा एक भाग अचानक खचल्याने या मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत असून वेळ आणि इंधनाचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

रस्ता बंद असतानाही संबंधित टोल नाक्यावर नियमितपणे टोल वसुली सुरू असल्याचा आरोप वाहनचालकांनी केला असून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वाहनधारकांनी "रस्ता उपलब्ध नाही, मग टोल कशासाठी?" असा सवाल उपस्थित करत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रस्ता खचल्यामुळे जळगाव–धुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून वाहनांना लांबचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे प्रवासाचा कालावधी वाढण्याबरोबरच इंधन खर्चातही मोठी वाढ झाली आहे. व्यावसायिक वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. स्थानिक नागरिकांनी आणि वाहनधारकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे (NHAI) तातडीने रस्ता दुरुस्त करून वाहतूक पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली आहे. तसेच रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला होईपर्यंत संबंधित टोल नाक्यावर टोल वसुली तात्काळ स्थगित करावी किंवा याबाबत अधिकृत भूमिका जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

एका संतप्त वाहनचालकाने प्रतिक्रिया देताना सांगितले, "पाळधी–तरसोद दरम्यान रस्ता खचल्यामुळे आधीच आमचा प्रवास लांबला आहे. सुविधा नसतानाही टोल आकारला जात आहे. रस्ता पूर्णपणे सुरू होईपर्यंत टोल वसुली बंद ठेवावी." रस्ता दुरुस्तीचे काम वेगाने पूर्ण करून वाहतूक सुरळीत करण्याबरोबरच वाहनचालकांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जळगाव जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## क्रांतीदिनी प्रागतिक विचार मंचातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव समारंभ

### गुणवंतांसह लोकसेवा-राज्यसेवा परीक्षेतील यशवंत विद्यार्थी व लोकप्रतिनिधींचाही होणार सन्मान

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी :** क्रांतीदिनाचे औचित्य साधून प्रागतिक विचार मंचाच्या वतीने भुसावळ शहर व तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रत्येक शाळेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा समारंभ रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रागतिक विचार मंचाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक




जे. पी. सपकाळे हे राहणार आहेत. समारंभास वरणगाव नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे, प्रागतिक चळवळींचे अभ्यासक प्रा. डॉ. जतीन मेढे, प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राजेश मानवतकर, जळगावचे पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे तसेच भुसावळ पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र पुंडलिक चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. यशवंत विद्यार्थी व लोकप्रतिनिधींचाही होणार गौरव या कार्यक्रमात लोकसेवा आयोग व राज्यसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या भुसावळ तालुक्यातील यशवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच भुसावळ आणि वरणगाव नगरपालिकेत अनुसूचित जाती प्रवर्गातून नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचाही प्रागतिक विचार मंचाच्या वतीने गौरव केला जाणार आहे.गुणवंत विद्यार्थ्यांची नोंदणी कार्यक्रमस्थळी दुपारी १ ते १.३० वाजेपर्यंत करण्यात येणार असून विद्यार्थी व पालकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन प्रागतिक विचार मंचाचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार संघरत्न सपकाळे यांनी केले आहे. क्रांतीदिनाचे औचित्य साधून प्रागतिक विचार मंचाच्या वतीने भुसावळ शहर व तालुक्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रत्येक शाळेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा समारंभ रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ वाजता भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयाच्या ग्रंथालय सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रागतिक विचार मंचाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक जे. पी. सपकाळे हे राहणार आहेत. समारंभास वरणगाव नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे, प्रा. डॉ. जतीन मेढे,डॉ. राजेश मानवतकर, जळगावचे पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरेराजेंद्र पुंडलिक चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेतील गैरप्रकारांच्या चौकशीसाठी 'एसआयटी' स्थापन

## तब्बल १५,४०७ संशयास्पद वैद्यकीय दाव्यांची सखोल चौकशी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई|प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने 'आयुष्मान भारत-पंतप्रधान जनआरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना' या महत्त्वाकांक्षी आरोग्य योजनांमधील वाढत्या गैरप्रकारांची गंभीर दखल घेत एका विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै रोजी विधानभवनात पार पडलेल्या बैठकीत आयुष्मान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत भाजपचे आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराची सविस्तर माहिती दिली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी एसआयटी नेमण्याची घोषणा केली होती. जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यभरातून पोर्टलवर दाखल झालेल्या तब्बल १५,४०७ संशयास्पद वैद्यकीय दाव्यांची सखोल चौकशी या पथकामार्फत केली जाणार आहे. एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून अनेक रुग्णांची नोंदणी करणे, चुकीची माहिती भरणे आणि एका वर्षात ५ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचे दावे वारंवार दाखल होणे, अशा अनेक तक्रारी समोर आल्यानंतर सार्वजनिक आरोग्य




विभागात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून काही रुग्णालयांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, मृत व्यक्तींच्या नावावरही उपचाराचे दावे दाखल करून पैसे लाटण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याच तपासाचा एक भाग म्हणून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सूचनेवरून नुकताच नाशिकमधील तीन खासगी रुग्णालयांच्या (शिव मल्टी-स्पेशालिटी, क्रिटिकेअर आणि ग्रेस हॉस्पिटल) संस्थापकांवर मुंबईतील वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रुग्णालयांनी ३६१ बोगस दाव्यांच्या माध्यमातून तब्बल १.७९ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. आयटी नेमण्याची घोषणा केली होती. जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यभरातून पोर्टलवर दाखल झालेल्या तब्बल १५,४०७ संशयास्पद वैद्यकीय दाव्यांची सखोल चौकशी या पथकामार्फत केली जाणार आहे. एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून अनेक रुग्णांची नोंदणी करणे, चुकीची माहिती भरणे आणि एका वर्षात ५ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचे दावे वारंवार दाखल होणे, अशा अनेक तक्रारी समोर आल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून काही रुग्णालयांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. शासकीय आरोग्य योजनांचा लाभ खऱ्या आणि गरजू रुग्णांपर्यंत विनाअडथळा पोहोचावा यासाठी राज्य सरकारने या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक आणि आरोग्य अधिकाऱ्यांना या १५ हजारांहून अधिक संशयास्पद दाव्यांची प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारतीय न्याय संहितेच्या फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार करण्याच्या विविध कलमांखाली सध्या गुन्हे दाखल केले जात असून, या एसआयटी चौकशीअंती राज्यातील आणखी काही बोगस रुग्णालये आणि त्यांचे संचालक रडारवर येण्याची दाट शक्यता आहे.

## पारोळ्यात ब्रह्माकुमारी संस्थेतर्फे 'दहा कोटी नशामुक्त भारत संकल्प अभियान'चा शुभारंभ

### व्यसनमुक्त समाजासाठी जनजागृती



जन सम्राट टाईम्स

**पारोळा|प्रतिनिधी:** ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारोळा यांच्या वतीने 'दहा कोटी नशामुक्त भारत संकल्प अभियान' उत्साहात प्रारंभ करण्यात आला. समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करून निरोगी, सुसंस्कृत आणि व्यसनमुक्त भारत घडविण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला. या अभियानाच्या शुभारंभप्रसंगी पारोळा नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष दादासाहेब चंद्रकांत बी. पाटील, उपनगराध्यक्ष रोहन दादा मोरे, माजी उपनगराध्यक्ष दीपकभाऊ अनुष्ठान तसेच नगरसेवक मनीषभाऊ पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यसनमुक्त समाजाची आवश्यकता अधोरेखित करत युवकांनी नशेपासून दूर राहून सुदृढ, सकारात्मक आणि संस्कारक्षम जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन केले. ब्रह्माकुमारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट करत समाजातील प्रत्येक घटकाने या जनजागृती मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे महत्त्व विशद केले.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज — ज

## जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त पथनाट्य आणि जनजागृती कार्यक्रम

### बाळाच्याजन्मानंतरचापहिलातासमहत्त्वाचा



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** 'माझा गाव आरोग्य संपन्न गाव अभियान' अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, नशिराबादच्या वतीने जागतिक स्तनपान सप्ताहाचे औचित्य साधून जाहीर पथनाट्य व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. येथील सार्वजनिक वाचनालयाजवळ, श्रीराम पेठेत पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्तनपानाचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व पटवून देत महिलांमध्ये व्यापक प्रबोधन करण्यात आले. हा कार्यक्रम प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा कोलते आणि डॉ. अमन पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय यांच्या विशेष सहकार्याने यशस्वीरित्या संपन्न झाला. पथनाट्य व समुपदेशनातून दिलेला महत्त्वाचा संदेश चिकाचे दूध हीच पहिली लस: बाळाच्या जन्मानंतरचा पहिला तास अत्यंत महत्त्वाचा असतो. मातेचे पहिले पिवळसर चिकाचे दूध हे बाळासाठी 'इम्युनिटी बुस्टर' म्हणजेच पहिली लस म्हणून काम करते, ही महत्त्वाची माहिती महिलांना देण्यात आली. ६ महिने निव्वळ स्तनपान: जन्मापासून पहिल्या सहा महिन्यांपर्यंत बाळाला केवळ आणि केवळ आईचेच दूध द्यावे; वरचे पाणी, मध किंवा इतर कोणतेही पदार्थ देऊ नयेत, याबाबत मातांचे विशेष समुपदेशन करण्यात आले. आजार आणि कुपोषणापासून बचाव: नियमित स्तनपानामुळे बाळाचे कुपोषणापासून रक्षण होते. तसेच डायरिया आणि न्यूमोनियासारख्या गंभीर आजारांचा धोका टळतो. मातेचे आरोग्य: स्तनपानामुळे बाळासोबतच मातेलादेखील स्तनाचा आणि गर्भाशयाचा कर्करोग (Cancer) होण्याचा धोका कमालीचा कमी होतो. हा महत्त्वपूर्ण संदेश याप्रसंगी देण्यात आला. उत्स्फूर्त प्रतिसाद व मान्यवरांची उपस्थिती या जनजागृती मोहिमेला नशिराबाद गावातील गरोदर माता, स्तनदा माता आणि महिलांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि जनआरोग्य समितीचे सदस्य डॉ. प्रमोद अमोदकर, न्यू इंग्लिश स्कूलचे संचालक श्री. जनार्दन माळी आणि श्री. बंडू खंडारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य सेवक दीपक तायडे, सुनील ढाके, वासुदेव पाटील, १०२ रुग्णवाहिकेचे चालक राजाराम पचपांडे तसेच परिसरातील सर्व आशा सेविकांनी विशेष परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र लोकनायक पुरस्कार–२०२६'ने प्रकाश विजयसिंग दाभाडे यांचा गौरव

### समाजसेवा क्षेत्रातील २५ वर्षांच्या योगदानाची राज्यस्तरीय दखल

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** धुळे डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस फेडरेशन (DDBBFF)चे अध्यक्ष तथा IBBFFचे राष्ट्रीय पंच इंजि. प्रकाश विजयसिंग दाभाडे यांना शरीरसौष्ठव, युवक विकास आणि समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र लोकनायक पुरस्कार–२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. दैनिक लोक युवा वृत्तपत्र यांच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा सोहळा दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी शेगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

गेल्या सुमारे २५ वर्षांहून अधिक काळ प्रकाश दाभाडे यांनी शरीरसौष्ठव क्षेत्रात कार्यरत राहून अनेक खेळाडूंना घडविण्याचे कार्य केले आहे. ग्रामीण भागातील होतकरू युवकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करणे, त्यांना व्यसनमुक्त जीवनाची प्रेरणा देणे, तसेच राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणे, या कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. धुळे डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस फेडरेशन (DDBBFF)चे अध्यक्ष तथा IBBFFचे राष्ट्रीय पंच इंजि. प्रकाश विजयसिंग दाभाडे यांना शरीरसौष्ठव, युवक विकास आणि समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र लोकनायक पुरस्कार–२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. दैनिक लोक युवा वृत्तपत्र यांच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.धुळे येथे धुळे डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस फेडरेशन (DDBBFF) ची स्थापना करून त्यांनी शेकडो खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. गरीब व होतकरू शरीरसौष्ठवपटूंना मोफत मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आवश्यक ते सहकार्य देत त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविले आहेत. पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सौ. धनश्रीताई खाटीकर (अध्यक्ष, मराठी-हिंदी पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य) उपस्थित होत्या. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विजय कुलकर्णी, अमोल अंधारे, चंद्रकांत घोराळे, बाळासाहेब दामोदर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रकाश दाभाडे यांच्या या सन्मानाबद्दल धुळे जिल्ह्यातील क्रीडा, व्यायामशाळा, शरीरसौष्ठव क्षेत्रातील प्रशिक्षक, खेळाडू तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कासोद्यात निंबोळ्यांच्या बीजारोपण मोहिमेचा शुभारंभ

### पर्यावरण संवर्धनासाठी उपक्रम, ट्रिगार्डला ₹१० हजारांची मदत

जन सम्राट टाईम्स



**कासोदा | प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीच्या उद्देशाने कासोदा येथे सुमारे तीन क्विंटल निंबोळ्यांच्या बीजारोपण मोहिमेचा शुभारंभ एरंडोल विभागाचे उपविभागीय अधिकारी मनीषकुमार गायकवाड यांच्या हस्ते बुधवारी (दि. ५) करण्यात आला. यावेळी ट्रिगार्ड संस्थेसाठी १० हजार रुपयांची आर्थिक मदतही देण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानंदा पाटील होत्या. यावेळी पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे उपअभियंता संदीप पाटील, वन परिक्षेत्र अधिकारी बळवंत पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत पाटील, सरपंच पुरुषोत्तम चौधरी, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद पाटील, धिरेन कालरिया व कृष्णपाल सिंग यांची प्रमुख उपस्थिती होती. कासोदा–पारोळा मार्गावरील साईबाबा मंदिराच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या उन्हाळ्यात संकलित करून वाळवून ठेवलेल्या सुमारे तीन क्विंटल निंबोळ्यांचे बीजारोपण चांगला पाऊस झाल्यानंतर सुरू करण्यात आले. या मोहिमेंतर्गत कासोदा ते मालखेडा, आडगाव, अंतुर्ली आणि वनकोठा या चारही दिशांना जाणाऱ्या सुमारे २० ते २५ किलोमीटर परिसरात निंबोळ्यांचे बीजारोपण करण्यात येत आहे. भविष्यात या भागात मोठ्या प्रमाणावर निंबाच्या झाडांची वाढ होऊन पर्यावरण संतुलनास हातभार लागणार आहे. यावेळी मनीषकुमार गायकवाड, संदीप पाटील, श्रीकांत पाटील, समाधान पाटील आणि महानंदा पाटील यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत वृक्षलागवड आणि बीजारोपण मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. गेल्या उन्हाळ्यात रोपांना पाणी देऊन त्यांचे संगोपन करणाऱ्या संदीप वाघ आणि प्रवीण पाटील यांचा प्रांताधिकाऱ्यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मालखेड्याचे सरपंच सचिन पाटील, सुरेश सूर्यवंशी, महेश पांडे, उमेश पाटील, गौरव पाटील, गोपाल पांडे, प्रितम पटेल, प्रल्हाद पाटील, प्रवीण पाटील, उमेश नवाल तसेच परिसरातील सरपंच, पोलीस पाटील आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद पाटील यांनी केले. सूत्रसंचालन हभप संजय जमादार यांनी तर आभार प्रदर्शन सूर्यकांत पाटील यांनी केले.

## विद्यार्थ्यांकडून क्रीडा शुल्काची मागणी?; चौकशी करून कारवाईची आयुक्तांकडे मागणी

### अकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलविरोधात तक्रार; शुल्क न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रीडा तासापासून वंचित ठेवल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी:** चिखली येथील अकॅडमिक हाइट्स पब्लिक स्कूलमध्ये शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून क्रीडा/ऑक्टिव्हिटी शुल्काची मागणी केली जात असून, शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांना नियमित क्रीडा तास व इतर क्रीडा उपक्रमांपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजपा कार्यकर्ते सचिन सुदाम काळभोर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, मोफत व सक्तीच्या बालशिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (RTE Act) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षणासह शाळेतील




नियमित शैक्षणिक, क्रीडा आणि सहशालेय उपक्रमांमध्ये समान संधी मिळणे अपेक्षित आहे.

मात्र संबंधित शाळेत आरटीई विद्यार्थ्यांकडून क्रीडा/ॲक्टिव्हिटी शुल्काची मागणी केली जात असल्याच्या तसेच शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांना क्रीडा तासात सहभागी होऊ दिले जात नसल्याच्या तक्रारी पालकांकडून प्राप्त झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित शाळेकडून क्रीडा शुल्काचे स्वरूप काय आहे, ते सर्व विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य की ऐच्छिक आहे, तसेच आरटीई विद्यार्थ्यांकडून असे शुल्क आकारण्यास कोणत्या शासन निर्णय अथवा कायदेशीर तरतुदीनुसार परवानगी आहे, याबाबत लेखी स्पष्टीकरण मागविण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, शुल्क ऐच्छिक असल्यास शुल्क न भरणाऱ्या आरटीई विद्यार्थ्यांनाही नियमित क्रीडा शिक्षण, क्रीडा उपक्रम आणि इतर सहशालेय कार्यक्रमांमध्ये कोणताही भेदभाव न करता सहभागी करून घेतले जाईल, याबाबत लेखी हमी घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच क्रीडा शुल्कासंदर्भातील परिपत्रके, नोटिसा, व्हॉट्सॲप संदेश, शासनमान्य शुल्क संरचना आणि संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## उपजिल्हा रुग्णालय, एमआयडीसी, पूल व रस्त्यांसह विविध विकासकामांवर भर

### जळगाव ग्रामीण मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याशी चर्चा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची जळगाव ग्रामीण मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी आणि मान्यवरांनी मुंबई येथे सदिच्छा भेट घेत विविध विकासकामांबाबत चर्चा केली. यावेळी पालकमंत्र्यांचा सत्कारही करण्यात आला. या बैठकीत धरणगाव तालुका आणि जळगाव ग्रामीण मतदारसंघातील प्रलंबित व प्रस्तावित विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगाव ग्रामीण मतदारसंघाचा सर्वांगीण कायापालट





करण्यासाठी अनेक विकासकामे सुरू असून काही प्रकल्प प्रगतिपथावर असल्याची माहिती दिली. धरणगाव येथे नागरिकांची अनेक वर्षांची मागणी असलेले उपजिल्हा रुग्णालय लवकरच साकार होणार असून, अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे नागरिकांना उपचारांसाठी जळगाव किंवा खासगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. धरणगाव तालुक्यात एमआयडीसी उभारण्यासाठी योग्य जागेचा शोध सुरू असून, जांभोरा परिसरात आवश्यक जमीन उपलब्ध झाल्यास उद्योगनगरी उभारण्याचा प्रस्ताव पुढे नेण्यात येईल. त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असेही त्यांनी नमूद केले. याशिवाय बालकवी ठोंबरे स्मारक, धरणगाव शहरासाठी नवीन पाणीपुरवठा पाइपलाइन, क्रीडा संकुल ते डॉ. हेडगेवार नगर रस्ता, शहरातील काँक्रीट रस्ते, तसेच विविध विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. संबंधित ठेकेदारांना दर्जेदार आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही सांगण्यात आले. बैठकीत असोदा उड्डाणपूल, भोकरदन पूल, निमखेडा पूल, मसावद उड्डाणपूल, मोहाडी येथील रुग्णालय, बहिणाबाई वारकरी भवन, तसेच जळगाव-भोकरदन, असोदा-भादली आणि अन्य महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांचा आढावाही घेण्यात आला. जळगाव शहरासाठी प्रस्तावित रिंग रोड आणि सुमारे ₹५५० कोटींच्या विकास आराखड्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. या शिष्टमंडळात शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व धरणगावचे माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील, जळगाव महानगरपालिकेचे उपमहापौर मनोज चौधरी, मागासवर्गीय सेनेचे जिल्हाध्यक्ष मुकुंद नन्नवरे, शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. रवींद्र चव्हाण, शेतकी संघाचे अध्यक्ष गजानन पाटील, व्यापारी सेनेचे निलेश मुसळे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## तंत्रज्ञानाच्या साथीने अधिक अचूक, पारदर्शकआणिप्रभावीपीकपाहणी!

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी:** शेतकऱ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांनी बुधवारी प्रत्यक्ष शेतात जाऊन ई-पीक पाहणी (DCS) ॲपच्या कार्यपद्धतीची पाहणी केली. यावेळी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पीक पाहणी अधिक अचूक आणि प्रभावी कशी होऊ शकते, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात आला. पाहणीदरम्यान विविध जमिनींची पडताळणी, सर्व्हे क्रमांकनिहाय प्लॉटचे निरीक्षण, तसेच बाजरी पिकावरील किडीची माहिती आणि त्यावरील उपाययोजनांची ॲपद्वारे तपासणी करण्यात आली. शेती व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत पीक पाहणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक, अचूक आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या डिजिटल उपक्रमांमुळे पीक नोंदणी, नुकसान भरपाई, विमा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.